7:43
Hello Latur_32 = 05...
PDF reader

# ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात क्विक हील फाउंडेशनच्यावतीने सायबर सुरक्षा सत्र संपन्न



लातूर/प्रतिनिधी – ज्ञानप्रकाश शैक्षणिक व सामाजिक प्रकल्पात दररोज होणारी प्रार्थना सभा म्हणजे विचारसभा म्हणून ओळखली जाते.त्यात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आध्यात्मिक, पर्यावरण, आरोग्यशिक्षक बाबींबर संवादात्मक चर्चा केल्या जातात. सध्याचे युग माहिती व तंत्रज्ञानाचे युग ..त्यात क्षणोक्षणी वेगवेगळे बदल होतात.आपण ही त्यापासून दूर नाहीत.आपण सर्वजण समाज माध्यमांचा वापर करतो.कळत नकळतपणे त्याच्या आहारी जाऊन आपले आर्थिक व मानसिक नुकसान होण्याची अनेक उदाहरणे आपण अनुभवत आहोत.यासंबंधी क्किक हील फाउंडेशन कंपनीच्या साहाय्याने सायबर सुरक्षा या विषयावर असे एकदिवसीय ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी जाणीव सत्र आयोजित केले.त्यात राजर्षी शाहू महाविद्यालयातील श्री.जाधव साहिल, श्री.पांढरे परमेश्वर, कु.बुलाणी नेहल व कु.तावर नम्रता यांनी मार्गदर्शन केले. कु.नेहल यांनी आपण ओळखी नसलेल्या व्यक्तींशी आपण समाजमाध्यमावर मैत्री करतो,विश्वास ठेवतो..त्यातच आपण अनेक वेळा फसतो किंवा आपली फसवणूक होते उदाहरण देऊन त्यांनी सांगितले.श्री.साहिल जाधव यांनी हसत खेळत गेमिंग,पासवर्ड,त्यातील बारकावे मुलांना समजून दिले आणि मुलांकडून विश्वास घेतला की आपल्याकडून त्यातील चुका होणार नाहीत त्याबद्दल. तसेच परमेश्वर आणि नम्रता यांनी समयोचित त्याबद्दल मार्गदर्शन केले.शेवटी मुलांनी सायबर सुरक्षेची शपथ ही घेतली.यावेळी मुख्याध्यापिका तथा संचालिका आदरणीय नरहरे मॅडम, शिक्षक व ८ वी ते १० वी चे सर्व विद्यार्थी उपस्थित होते

हे पत्रक मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी प्रकाशक, मालक, संपादक पंकज गोकुळप्रसाद जयस्वाल यांच्या
लक्ष्मी कॉलनी, लातूर ता. जि. लातूर – ४१३ ५१२ येथे प्रकाशित केले. संपादक : पंकज गोकू

Printed by Mahesh Motiram Rathod and Published, Owned & Edited by
And Published at. : Hallo latur Office, Jaiswal
Editor : Pankaj Gokulprasad Jaiswal, Mobile 942247